सकाळ TODAY

# 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' विषयावर करार

**पिंपरी, ता. २० :** डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य .आणि विज्ञान महाविद्यालय आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणpfत पाटील आणि क्विक हिल फाउंडेशनचे सहयोगी संचालक अजय शिर्के यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या मोहिमेअंतर्गत शहरातील अनेक शाळा, महाविद्यालये तसेच, एमआयडीसी परिसरातील कामगार, बांधकाम कामगार, शेतकरी, आशा कर्मचारी, सफाई कर्मचारी इ. बांधवांना सायबर सुरक्षित करण्यासाठी विविध प्रक्रिया वापरण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला आहे.

ऑपरेशन सिंदूर दरम्यान जवानांनी गाजवलेल्या शौर्याप्रती कृतज्ञता म्हणून महाविद्यालयाने यावर्षीचे कार्य सर्व सशस्त्र सेनादलांना समर्पित करण्याचा निर्धार केला आहे. या मोहिमेसाठी महाविद्यालयाकडून चार विद्यार्थ्यांची क्लब ऑफिसर्स म्हणून निवड करण्यात आली आहे.

क्लबची उद्दिष्टे आणि दृष्टिकोन, डेटा व अहवाल हाताळणे अशी असून सत्रे आणि सादरीकरणे, सोशल मीडियाद्वारे मार्केटिंग इ. अशा जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या. शिक्षक समन्वयक प्रा. सत्यवान कुंजीर, अध्यक्ष गौरांग मराठे, सचिव अथर्व तांबे, आदिती वाबळे आणि जनसंपर्क व सामाजिक माध्यम संचालक सिद्धांत हत्ते या ऑफिसर्सची निवड करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील, सचिव डॉ. सोमनाथ पाटील यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



**पिंपरी :** डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.